# महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था (MRRDA), ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी कार्यकारी अभियंता/उप अभियंता ही पदे ११ महिने किंवा शासनाने निश्चित केलेल्या कर्तव्यानुरूप कामाची प्रगती होईल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी करार पद्धतीने भरण्यासाठी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता एकूण २ पदे व सेवानिवृत्त उप अभियंता एकूण ११ पदे अशा एकूण १३ पदांचे एम्पॅनलमेंट (Empanelment) तयार करावयाचे आहे. (सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता- मुंबई १ पद, औरंगाबाद १ पद) (सेवानिवृत्त उपअभियंता - पुणे ३ पदे, अमरावती, अकोला, ठाणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांसाठी प्रत्येकी १ पद).

या पदांकरिता स्थापत्य अभियांत्रिकी अभियंता संवर्गातील सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता / उप अभियंता यांचेमधून अभियंत्यांची निवड करण्यात येईल. या पदांकरिता सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता / उप अभियंता यांचे मासिक परिश्रमिक व भत्ते सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ अन्वये मंजूर करण्यात येईल. इच्छुक सेवानिवृत्त अभियंत्यांनी दि. २८/०१/२०२१ पर्यंत वित्तीय नियंत्रक तथा उपसचिव (मु.मं.ग्रा.स.यो./प्र.मं.ग्रा.स.यो.), ग्रामविकास विभाग विभाग, ५ वा मजला, बांधकाम भवन, मुंबई यांचेकडे बंद लिफाफ्यात अर्ज करावा.

अर्जाचा नमुना महाराष्ट्र शासनाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. **(https://rdd.maharashtra.gov.in/)**

## पात्रतेसाठी निकष

## पद :- कार्यकारी अभियंता / उपअभियंता

**१) शैक्षणिक पात्रता :-** मान्यता प्राप्त विद्यापीठाचा स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर अथवा पदविकाधारक.

**२) वयोमर्यादा :-** कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांच्या आतील (दिनांक ०१/०१/२०२० रोजी)

**३) अनुभव :-**

I) सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये संबंधित पदावरील (कार्यकारी अभियंता / उपअभियंता) ३ वर्ष कार्याचा अनुभव असावा.

II) रस्ते व पुलांची बांधकामांमध्ये २० वर्षाचा अनुभव असावा.

III) मुख्यमंत्री/प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामाबाबतची पूर्ण माहिती व अनुभव असावा.

## इतर अटी :-

१) अर्ज विहित नमुन्यात नसल्यास किंवा कोणत्याही प्रकारे अपूर्ण असलेला अर्ज फेटाळण्यात येईल.

२) मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास शैक्षणिक अर्हता, अनुभव, कार्यक्षेत्रातील सेवेचा कालावधी इत्यादी बाबींचा प्राधान्याने विचार करून अर्जांची निवड करण्यात येईल व तद्नंतर अशा अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

३) मराठी भाषेमध्ये पत्रव्यवहार करता येणे आवश्यक आहे.

४) अर्ज, वरील माहिती व आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित मार्गाने नोंदणीकृत/स्पीड पोस्टाने खालील पत्त्यावर दि. २८/०१/२०२१ सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठवावेत.

ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. (https://rdd.maharashtra.gov.in/)

**पत्रव्यवहाराचा पत्ता :- वित्तीय नियंत्रक तथा उपसचिव (मु.मं.ग्रा.स.यो./प्र.मं.ग्रा.स.यो.),**
**ग्रामविकास विभाग विभाग, ५ वा मजला, बांधकाम भवन,**
**मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**सही/-**
**(प्रवीण जैन)**
**वित्तीय नियंत्रक तथा उपसचिव, महाराष्ट्र शासन**

(डीजीआयपीआर- १६७१/२०२०-२१)